RTE

नमुना - 2

2777

शाळा मान्यता आदेश

क्र. बुजिप-शिप्रा-खाप्राशा- -2023
शिक्षण विभाग (प्राथमिक)
बुलडाणा जिल्हा परिषद, बुलढाणा.
दिनांक 26-/-5---- 2023

प्रति,

व्यवस्थापक / मुख्याध्यापक
**डॉ. रमेशचंद्र बेगाणी इंटरनॅशनल स्कुल, देऊळगावमही,, ता.दे.राजा.जि.बुलढाणा.**

**विषय** :- बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम , 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 यांच्या नियम 11, पोट नियम (4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र नुतनीकरण बाबत.

**संदर्भ** :- 1. गट शिक्षणाधिकारी पं.स. ता.दे.राजा.जि.बुलढाणा यांचे पत्र क्र पंसदे/44/2023 दिनांक 26 मे,2023
2. प्रस्तुत कार्यालयाचे शाळा नुतनीकरण आदेश क्र. बुजिप-शिप्रा-खाप्राशा--/ /20 दि ..

वरील संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने गट शिक्षणाधिकारी ता.दे.राजा.जि.बुलढाणा यांचे पत्र क्रमांक पंसदे/44/2023 दिनांक 26 मे,2023 मधील तपासणी अहवालातील शिफारशीनुसार, मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा दिनांक 01.04.2023 पासून ते दिनांक 31.03.2026 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता इयत्ता 1 ते 8 वी, डॉ. रमेशचंद्र बेगाणी इंटरनॅशनल स्कुल, देऊळगावमही,(27040403617) या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे. सदर मान्यता हि खालील शर्ती अटींच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

1. मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता पाचवी/आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्रातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीनुसार शाळा पालन करील.
3. शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतुन काढुन टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.
   (सात) अधिनियमाच्या कलम 23(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि
   (आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवुण घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.
8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

**<u>तपासणीच्या वेळेस शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे असल्याचे गट शिक्षणाधिकारी ता.दे.राजा.जि.बुलढाणा यांनी प्रमाणीत केले आहे.</u>**

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- 6000 चौमी.
- एकुण बांधकाम क्षेत्र :- 2000 चौमी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- 4000 चौमी.
- वर्ग खोल्यांची संख्या :- 16
- कार्यालय नि भांडार नि मुख्याध्यापकाची खोली :- आहे
- मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे - आहे

for.
Principal
Dr.Rameshchand Begani International School,Deulgaon Mahi

- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल :- आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा :- बोअर
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- लागु नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध :- आहे

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्या ही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षीत व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्र तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक 27040403617 आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा सुचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीमध्ये कोणतेही बदल / नुतनीकरण बाबतची सुनिश्चिती केल्याबाबत या कार्यालयास अवगत करावे.
19. जोडपत्र " तिन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
20. नियमानुसार अद्ययावत अग्नीशमन यंत्रे बसविण्याच्या अटीवर तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.

( बी.आर.खरात )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, बुलढाणा.

**प्रतिलिपी,**

1-गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, **ता.दे.राजा.जि.बुलढाणा** यांना माहिती करीता रवाना आपणास सुचित करण्यात येते कि, उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करुन घेण्याबाबत आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

For.

Principal
Dr.Rameshchand Begani International School.Deulgaon Mahi